Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal


March -2021

ISSUE No- (CCLXXVI ) 276 - D

## Women's Rights : Status & Goal







Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Executive Editor:
Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

Editor:
Dr.Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci,
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 276 (CCLXXVI) A
ISSN : 2278-9308
March, 2021



| | | |
|---|---|---|
| 22 | स्त्री आणि पर्यावरण – एक तात्विक बाजू स्मिता बैतुले | 94 |
| 23 | महिलांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान प्रा.प्रफुल ई. ढोके | 98 |
| 24 | शिक्षण व महिलांचे कायदेविषयक हक्क डॉ.दयाराम दुधाराम पवार | 101 |
| 25 | महिलांचे अधिकार :स्वरूप आणि वास्तव निता दत्तू घडलिंग | 105 |
| 26 | पंचायतराज मध्ये महीलांचे सक्षमीकरण आणि स्वावलंबन प्रा.डॉ.शुद्धोधन एस. गायकवाड | 109 |
| 27 | भारतातील स्त्रीवादी चळवळ प्रा.संजय अंकुशराव जगताप | 114 |
| 28 | राजकारणात महिलांच्या समानतेचा संघर्ष डॉ. अरविंद सोमनाथे | 117 |
| 29 | भारतीय सर्वोच्च मार्गदर्शिका निर्माण कार्यात स्त्रियांचे योगदान प्रा. डॉ. सुनिता शं. कुरूडे | 121 |
| 30 | अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि स्त्रियांचीस्थिती सुवर्णा ज्ञानेश्वर सोनुने | 126 |
| 31 | भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार प्रा. सिध्दार्थ बी. टेंभूर्णे | 129 |
| 32 | भारतीय राज्यघटना आणि महिला अधिकार शेख उजमा खलील | 133 |
| 33 | राजकीय पक्षात महिलांची भूमिका उज़्मा ऐनोद्दीन सिद्दीकी | 136 |
| 34 | महिलांचे मानवाधिकार डॉ. वकील टी. शेख | 140 |
| 35 | महिला सक्षमीकरण – एक अवलोकन डॉ. हिराचंद चोखाजी वेस्कडे | 145 |
| 36 | भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार व कायदे डॉ. विजया एच. राऊत | 149 |
| 37 | स्त्री सक्षमी करण्याकरीता शासनाच्या योजना प्रा. विलास मेश्राम | 156 |
| 38 | स्त्री–भ्रूणहत्या: एक सामाजिक प्रश्न डॉ. विनोद बी. खेडकर | 160 |
| 39 | पंचायतराज व्यवस्थेत महिलांचा सहभाग प्रा. मनोहर शामराव वागतकर | 165 |



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 276 (CCLXXVI) A
ISSN : 2278-9308
March, 2021

# स्त्री सक्षमी करण्याकरीता शासनाच्या योजना

प्रा. विलास मेश्राम
मराठी विभाग प्रमुख डॉ. एल.डी.बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट अॅन्ड कॉमर्स पवनी

**प्रस्तावना :—**

देशाला विकसित करावयाचे असेल तर मातृशक्ती सक्षम करण्याची गरज आहे. महिलांचे सक्षमीकरण, सुरक्षितता आणि आरोग्य सवर्धनासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. केंद्र शासनाची 'बेटी बचाव बेटी पढाव' आणि राज्य शासनाची 'माझी कन्या भाग्यश्री' या योजना मुळे मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढत आहे.

महिलांच्या सर्वागिंण विकासासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी शासनामार्फत व्यापक धोरणे राबविण्यात येत आहेत. शासना मार्फत राबविण्यात येत असलेल्या मनोधैर्य योजनेच्या नावातच त्याचा उददेश सामावलेला आहे. बलात्कारपीडीत, अॅसिड हल्यात जखमी झालेल्या अन्यायग्रस्त महिलांचे मनोधैर्य वाढवून त्यांचा पून्हा नव्याने उभारी देण्याची गरज असते. घडलेली घटना हा अपघात आहे. अपघातातून सावरून आपण आपले जीवन नव्याने पुन्हा सुरू करतो. शेतीत काम करणा—या महिला स्वत:चा बचत गट चालवून कुटुंब चालविणा—या महिला ख—या अर्थाने करीअर वूमेन आहेत. घर—मुले—बाळ सांभाळून त्या दिवसभर राबतात. देशाच्या आर्थिक प्रगतित त्यांचा मोलाचा वाटा आहे. कुटुंब आणि करीअर या दोन्ही बाबी प्रत्येक वेळी सांभाळण्याची शक्ती स्त्रियामध्ये आहेत. समाजात स्त्री म्हणून काम करून असतांना तीने स्त्रीत्व जपुन आत्मशक्ती वाढवली पाहिजे. त्यामुळे स्त्री शक्तीला जास्तीत जास्त प्राधान्य देण्याची गरज आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन नेहमीच सकारात्मक दृष्टीकोन ठेवून वेगवेगळया मार्गाने त्यांना मदत करत असते. महिला स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हाव्यात त्यांचा विकास व्हावा. त्या जोमाने विकास कामात सहभागी व्हाव्यात यासाठी शासन अनेक योजना राबवित आहे. महिला बचत गट, सुवर्णजयंती ग्राम स्वयं रोजगार योजना आदी विविध योजना वेगवेगळया विभागामार्फत राबविल्या जातात. याशिवाय सर्व समावेश असे महिला धोरणही राबविण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात व महाविद्यालयामध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी महीलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. मुलीं साठी सैनिकी शाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. शासकिय कागदपत्रामध्ये पाल्यांच्या वडीलांसोबत आईच्या नावाचा उल्लेख सुध्दा केला जात आहे. महिलांसाठी सावित्रीबाई फुले योजना, मातृत्व अनुदान, स्त्री डॉक्टरांच्या सेवा अशा अनेक योजना शासनाने महिला विषयक धोरणात जाहीर केले आहेत. दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत महिला समाजाच्या आधारस्तंभ बंनल्या आहेत. कधी प्रमेळ कन्या तर कधी वात्सल्यपूर्ण माता तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अत्यंत कुलशतेने आणि कोमलतेने त्या निभावत आहेत.

**१) अस्मिता योजना :—** महिलांच्या अस्मितेच्या रक्षणासाठी घेण्यात आलेली अत्यंत महत्वपूर्ण योजना आहे. ग्रामीण भागातील किशोर वयीन मुली आणि महिलांमध्ये मासीक पाळी दरम्यान स्वच्छतेचा पारंपारीक सवयी, समज—गैरसमज अणि अंधश्रध्दा यामुळे त्यांचे आरोग्य शिक्षण व रोजगार यावंर विपरित परिणाम होत असल्याचे तसेच ग्रामीण भागात स्वच्छतेसाठी सॅनिटरी नॅपकीनचा उपयोग केवळ १७ टक्के मुली व महिला करीत आहेत. असे दिसून आले. बाजारात उपलब्ध असलेल्या सॅनिटरी नॅपकिन ची न परवडणारी किंमत तसेच लोकलाजेस्तव दुकानदाराकडे सॅनिटरी नॅपकिन मागण्यासाठी जाण्याचा संकोच या कारणामुळे या मुली व महिला त्याचा वापर करू शकत नाही. या संवेदनशिल बाबिचा विचार करून ग्रामीण भागातील मुली व महिलांचा आरोग्य शिक्षण व रोजगाराचे चित्र बदलण्यासाठी ग्राम विकास विभागातर्फे अस्मीता योजना सुरू करण्यात आली.

**२) माजी कन्या भाग्यश्री योजना :—** राज्यातील मुलींच्या जन्मदर वाढवणे, त्यांच्या आरोग्याचा दर्जा उंचावणे, त्यांना शिक्षण देणे, त्यांच्या उज्वल भविष्याकरीता आर्थिक तरतुद करणे. बालविवाहास प्रतीबंध करणे व मुलगी वासदार होउ शकते ही भूमिका समाजामध्ये रूजवविणे या उददेशाने राज्य शासनाने माझी कन्या भाग्यश्री ही योनजा सुरू केली आहे.



Scanned with OKEN Scanner